नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - २३ Issue - 23 | वार - बुधवार दि. १७ जून २०२६ Blow- Wednesday Date 17 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ३१ ऑगस्टपर्यंत उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करा

## सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना; मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण प्रशासनाला दिले सतर्क राहण्याचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात मान्सूनचे आगमन लांबणीवर गेल्यामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये उद्भवलेल्या पाणीटंचाईचे पडसाद मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत उमटले. राज्यातील धरणांमध्ये सध्या केवळ २५ टक्केच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिल्याने चिंता व्यक्त करण्यात आली. उपलब्ध पाणीसाठ्याचे संकट लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश दिले असून, सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाणी अत्यंत जपून वापरण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, हवामान अंदाजानुसार येत्या २३ जूननंतर राज्यात मान्सून पूर्ववत सक्रिय होईल, अशी शक्यता बैठकीत वर्तवण्यात आली.





मंगळवारी मंत्रालयात आयोजित मंत्रिमंडळ बैठकीत जलसंपदा विभागातर्फे राज्यातील धरणांमधील पाणीसाठ्याबाबतचे सविस्तर सादरीकरण (प्रेझेंटेशन) करण्यात आले. या अहवालातील आकडेवारी अत्यंत चिंताजनक असून, पुढील अडीच महिने पाण्याचा काटेकोर वापर करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर असणार आहे. जलसंपदा विभागाच्या अहवालानुसार, राज्यातील एकूण ३ हजार २८ लहान-मोठ्या धरणांमध्ये सध्या अवघा १ हजार ४४२.३४ टीएमसी म्हणजेच फक्त २५ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत धरणांमध्ये ३१ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता, म्हणजेच गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पाणीसाठा ६ टक्क्यांनी घटला आहे. जिल्हानिहाय आणि विभागनिहाय आकडेवारीचा विचार केला असता, पुणे विभागातील परिस्थिती सर्वाधिक गंभीर असल्याचे समोर आले आहे. पुण्याच्या ७२४ धरणांमध्ये सध्या ५३८.६४ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असून हे प्रमाण गेल्या वर्षीच्या २८ टक्क्यांच्या तुलनेत कमालीचे घटले आहे. २३ जूननंतर जरी मान्सून सक्रिय होण्याचा अंदाज असला, तरी संभाव्य धोका टाळण्यासाठी राज्य सरकारने आधीच सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सतर्क केले आहे. धरणांमधील उपलब्ध पाणी पिण्यासाठी प्राधान्याने राखून ठेवले जावे आणि ३१ ऑगस्टपर्यंत पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरला जावा, अशा सूचना मंत्रिमंडळ बैठकीत सूत्रांनी दिल्या आहेत. - पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या मुख्य सचिवांनी तातडीने पावले उचलत सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना विशेष मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. - त्यानुसार, धरणांमधून किंवा मुख्य जलवाहिन्यांतून होणारा पाण्याचा अवैध उपसा रोखण्यात यावा आणि दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. सध्याच्या राज्य सरकारच्या धोरणानुसार, टंचाईच्या काळात जर संबंधित धरणात ३३ टक्क्यांपेक्षा जास्त पाणीसाठा उपलब्ध असेल, तरच खरिपाच्या पिकांसाठी सिंचनाचे पाणी सोडण्याबाबत नियोजन करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## महाराष्ट्र पोलिस दलाच्या आधुनिकीकरणासाठी
# ७३३.२८ रुपयांचा निधी मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : महाराष्ट्र पोलिस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र सरकारकडून ७३३.२८ कोटी रुपयांची योजना मंजूर करण्यात आली आहे. या योजनेमार्फत ६० टक्के निधी केंद्र तर ४० टक्के निधी राज्य सरकार देणार आहे. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे आभार मानले आहेत. सागरी सुरक्षा, ड्रग्जविरोधी मोहिम, सायबर सुरक्षा, आधुनिक शस्त्रे, वाहने सुसज्ज करण्यास मदत होणार आहे.

केंद्र सरकारकडून ७३३.२८ कोटी रुपयांची योजना मंजूर केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्वीट करत केंद्र सरकारचे आभार मानलेत. या योजनेत ६० टक्के निधी केंद्र सरकार तर ४० टक्के निधी राज्य सरकार देईल. महाराष्ट्र पोलिस दलासाठी इतका मोठा निधी मंजूर केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा यांचा अतिशय मनापासून आभारी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. सागरी सुरक्षा, ड्रग्जविरोधी मोहीम, सायबर



सुरक्षा, एआय तंत्रज्ञानाचा अधिक वापर, नागरिकांची सुरक्षा, आधुनिक शस्त्र, वाहने अशा अनेक दृष्टीने महाराष्ट्र पोलिस दल अधिक सुसज्ज करणे यातून शक्य होणार आहे.

पोलिसांकडे केवळ मनुष्यबळ असून चालणार नाही, तर तांत्रिक बळ असणेही तितकेच गरजेचे

सध्याच्या काळात नेहमीच्या गुन्हेगारीसोबतच डिजिटल आणि संघटित गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. अशा वेळी पोलिसांकडे केवळ मनुष्यबळ असून चालणार नाही, तर तांत्रिक बळ असणेही तितकेच गरजेचे आहे.

केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे महाराष्ट्र पोलिस दल देशातील सर्वात सुसज्ज, कार्यक्षम आणि हायटेक दलांपैकी एक बनेल, असा विश्वास प्रशासकीय वर्तुळातून व्यक्त केला जात आहे. सायबर सुरक्षा आणि एआय (ख) सायबर गुन्हे आणि ऑनलाईन फसवणूक रोखण्यासाठी प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) तंत्रज्ञानाचा वापर व सायबर सेलचे सक्षमीकरणासाठी या निधीचा वापर केला जाणार आहे.

सागरी सुरक्षा

राज्याच्या विस्तीर्ण किनारपट्टीच्या संरक्षणासाठी आधुनिक यंत्रणा आणि संसाधनांची उभारणीसाठी या निधीचा वापर करण्यात येणार आहे.

आधुनिक शस्त्रास्त्रे आणि वाहने

पोलिस दलाला अत्याधुनिक शस्त्रे आणि घटनास्थळी तातडीने पोहोचण्यासाठी नवीन वेगवान वाहने पुरवणेयासाठी या निधीचा वापर केला जाणार आहे.

नागरिक सुरक्षा

महिला, बालके आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी विशेष तांत्रिक उपाययोजना करण्यासंदर्भात या निधीचा वापर केला जाणार आहे.

## नगरसेवकांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राखीव जागांवर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी) आणि इतर मागास प्रवर्गातील (ओबीसी) ज्या उमेदवारांना तांत्रिक अडचणींमुळे वेळेत जात वैधता प्रमाणपत्र सादर करता आले नाही, त्यांना आता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आणखी सहा महिन्यांची अंतिम मुदतवाढ देण्याचा निर्णय मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

सन २०२५-२६ मध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अनेक उमेदवारांना प्रशासकीय अडचणींमुळे जात वैधता प्रमाणपत्र वेळेत मिळवणे कठीण झाले होते. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन सरकारने मुंबई महानगरपालिका अधिनियमासह इतर संबंधित कायद्यांमध्ये सुधारणा करून राज्यपालांच्या मान्यतेने अध्यादेश काढण्याचा निर्णय घेतला आहे. जात पडताळणी समित्यांकडे असणारे अपुरे मनुष्यबळ आणि त्यातच जनगणनेच्या कामासाठी शासकीय व निमशासकीय शाळांमधील शिक्षकांची नियुक्ती करण्यात आल्यामुळे ही मुदतवाढ देण्याची वेळ सरकारवर आली आहे.

(पान ३ वर...)




**महसूलमंत्री बावनकुळे यांची घोषणा**

# महिला बचत गटांना देणार अडीच एकर जमीन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी राज्य सरकारने एक अत्यंत महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. सरकारच्या निश्चित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या पात्र महिला बचत गटांना व्यवसाय आणि शेतीसाठी सरकारकडून तब्बल एक हेक्टर म्हणजेच अडीच एकर जमीन देण्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी केली आहे. सरकारच्या या धोरणामुळे ग्रामीण भागातील महिलांना हक्काची रोजगार निर्मिती उपलब्ध होणार असून, महसूल विभागाच्या ताब्यातील हजारो हेक्टर पडीक जमिनींचा प्रश्नही निकाली निघणार आहे. या जमिनींवर उत्पादक उपक्रम सुरू करण्यासाठी सरकारकडून १ लाख रुपयांचे आर्थिक अनुदानही दिले जाणार आहे.

ग्रामीण अर्थकारणाला नवी गती देणाऱ्या या योजनेमुळे महिला बचत गटांचे उत्पन्न वाढवण्यासोबतच शासकीय मालमत्तांचे रक्षण करण्याचे दुहेरी उद्दिष्ट सरकारने डोळ्यांसमोर ठेवले आहे. शासनाच्या या नव्या धोरणानुसार, मोकळी जमीन मिळण्यासोबतच महिला बचत गटांना किंवा महिला सहकारी संस्थांना व्यवसाय उभा करण्यासाठी १ लाख रुपयांचे अनुदान दिले जाईल. या आर्थिक मदतीसाठी जिल्हा नियोजन समिती किंवा जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या निधीचा प्रामुख्याने वापर केला जाईल. विशेष म्हणजे, ही जमीन महिला बचत गटांना कायमस्वरूपी मालकी हक्काने दिली जाणार नसून, ती पाच वर्षांच्या लीजवर (भाडेपट्ट्याने) उपलब्ध करून दिली जाणार आहे.



या अडीच एकर जमिनीवर महिला बचत गटांना चारा लागवड, नेपियर गवताची शेती, बांबूची लागवड किंवा ग्रासलँड डेव्हलपमेंट (कुरण विकास) यांसारखे उत्पन्न देणारे शेतीपूरक उपक्रम राबवता येणार आहेत. या जमिनीवर योग्य प्रकारे लागवड केल्यास महिला बचत गटांना वार्षिक ४ ते ५ लाख रुपयांचे उत्पन्न सहज मिळू शकते, असा दावा महसूल विभागाने केला आहे. सर्वात महत्त्वाची आणि दिलासादायक बाब म्हणजे, या जमिनीतून मिळणाऱ्या संपूर्ण नफ्यावर आणि उत्पन्नावर केवळ संबंधित महिला बचत गटाचाच पूर्ण अधिकार असेल; त्यावर सरकार कोणताही आर्थिक दावा करणार नाही.

कायदेशीर अतिक्रमणांना बसेल आळा

सध्या महसूल विभागाकडे राज्यभरात मोठ्या प्रमाणावर शासकीय जमिनी पडीक अवस्थेत आहेत, ज्यांचा नजीकच्या भविष्यात कोणत्याही शासकीय प्रकल्पासाठी वापर होण्याची शक्यता नाही. अशा मोकळ्या आणि पडीक जमिनींवर अनेकदा बेकायदेशीर अतिक्रमणे होतात. सरकारच्या या नव्या योजनेमुळे अशा पडीक जमिनी महिलांच्या कायदेशीर ताब्यात राहतील. परिणामी, एकीकडे ग्रामीण भागात रोजगार निर्माण होईल आणि दुसरीकडे मौल्यवान सरकारी जमिनींचे अतिक्रमणांपासून कायमस्वरूपी संरक्षण होईल.

## संपादकीय....

# काटकसरीचे आवाहन

राज्यातील धरणांमध्ये सध्या केवळ २५ टक्केच उपयुक्त पाणीसाठा शिल्लक राहिल्याने चिंता व्यक्त करण्यात आली. उपलब्ध पाणीसाठ्याचे संकट लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण प्रशासनाला सतर्क राहण्याचे निर्देश दिले असून, सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाणी अत्यंत जपून वापरण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दरम्यान, हवामान अंदाजानुसार येत्या २३ जूननंतर राज्यात मान्सून पूर्ववत सक्रिय होईल, अशी शक्यता बैठकीत वर्तवण्यात आली. मंत्रालयात आयोजित मंत्रिमंडळ बैठकीत जलसंपदा विभागातर्फे राज्यातील धरणांमधील पाणीसाठ्याबाबतचे सविस्तर सादरीकरण (प्रेझेंटेशन) करण्यात आले. या अहवालातील आकडेवारी अत्यंत चिंताजनक असून, पुढील अडीच महिने पाण्याचा काटेकोर वापर करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर असणार आहे. जलसंपदा विभागाच्या अहवालानुसार, राज्यातील एकूण ३ हजार २८ लहान-मोठ्या धरणांमध्ये सध्या अवघा १ हजार ४४२.३४ टीएमसी म्हणजेच फक्त २५ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत धरणांमध्ये ३१ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता, म्हणजेच गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पाणीसाठा ६ टक्क्यांनी घटला आहे. जिल्हानिहाय आणि विभागनिहाय आकडेवारीचा विचार केला असता, पुणे विभागातील परिस्थिती सर्वाधिक गंभीर असल्याचे समोर आले आहे. पुण्याच्या ७२४ धरणांमध्ये सध्या ५३८.६४ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा शिल्लक असून हे प्रमाण गेल्या वर्षीच्या २८ टक्क्यांच्या तुलनेत कमालीचे घटले आहे. २३ जूननंतर जरी मान्सून सक्रिय होण्याचा अंदाज असला, तरी संभाव्य धोका टाळण्यासाठी राज्य सरकारने आधीच सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सतर्क केले आहे.

# सांगलीच्या बुरुड सुकन्येचे कर्नाटकात साम्राज्य....

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माणसे व माणुसकी जपणाऱ्या अष्टपैलू सौ.मेनकाताई कोरडे कर्नाटक मेदा आदिवासी कल्याण सेवा संघटनेच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी पूर्वाश्रमीच्या सांगलीच्या मेनकाताई कुकडे व आत्ताच्या बेळगाव येथील सौ.मेनकाताई रामकृष्ण कोरडे यांची फेरनिवड करण्यात आली आहे,त्यानिमित्त माणसे व माणुसकी जपत चौफेर प्रगती साधणाऱ्या अष्टपैलू सौ.मेनकाताई यांच्या नेतृत्व व कार्यकर्तृत्वावर टाकण्यात आलेला हा एक प्रकाशझोत.



केवळ स्वयंपाकातच तर नव्हे तर सामाजिक व राजकीय क्षेत्रात सुगरण ठरलेल्या सौ.मेनकाताई यांचा सर्वस्पर्शी नेतृत्व व कामामुळे दिवसेंदिवस नावलौकिक वाढत आहे आणि त्यांच्याकडे नवनवीन जबाबदाऱ्या येत आहेत,त्यामुळे नेतेमंडळी व सर्वसामान्य लोकांच्या त्यांच्याकडून अपेक्षा खूप वाढल्या आहेत.

सध्या सौ.मेनकाताई ह्या बुरुड समाजाचे गल्लीपासून दिल्लीपर्यंत नेतृत्व करीत आहेत.त्या बेळगाव येथील बी के कंग्राली ग्रामपंचायत समितीच्या सदस्या या छोट्या पदापासून ते अखिल बुरुड समाज महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्ष या मोठ्या पदावर कार्यरत आहेत.त्यांनी आपल्या मधाळ स्वभावाने प्रभाव निर्माण केला आहे. शांत व नम्र असलेल्या सौ.मेनकाताईंचा जादुई जनसंपर्क हा माणसे व माणुसकी जपणारा आहे.त्यातून त्यांचे जनसंघटन दिवसेंदिवस वाढत असून ते अधिक बळकट होत आहे. त्यांच्या वागण्यात कोणताही भेद नाही.सब समाज को लिये साथ में आगे ही बढते जाना है,जहा एकता की डोर हो या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांच्या नेतृत्वाचे आकर्षण अधिक वाढत आहे.ही त्यांची अत्यंत जमेची बाजू आहे.

माहेर व सासरचा कोणताही वसा व वारसा नसताना सौ.मेनकाताईंनी आज सार्वजनिक जीवनात सर्वागीण केलेली चौफेर प्रगती थक्क करणारी व आश्चर्याने तोंडात बोट घालण्यास लावणारी आहे.महाराष्ट्रातील कृष्णा नदीच्या काठावर वसलेले सांगली हे त्यांचे माहेर.येथील सौ.विद्याताई व श्री.अंकुशराव कुकडे यांच्या त्या ज्येष्ठ सुकन्या होय.सामान्य कुटुंबातील जन्म व लवकर लग्न झाल्यामुळे त्यांना जेमतेम दहावीपर्यंतच शिक्षण घेण्याची संधी मिळाली,पण कमी शिक्षण हे त्यांच्या प्रगतीत कधीच अजिबात अडथळा ठरले नाही,कारण त्यांच्या नेतृत्व व कर्तृत्वाने अवघे आकाश ठेंगणे केले आहे.

१९९९ ला लग्न झाल्यावर मराठी प्रांतातील सौ.मेनकाताई ह्या बेळगावच्या कन्नड प्रांतात दाखल झाल्या.त्यांनी अल्पावधीत कन्नड भाषा अवगत केली. आज त्यांनी मराठीबरोबर कन्नड व हिंदी भाषेवर प्रभुत्व मिळवले आहे,या तिन्ही भाषांमुळे त्यांचा महाराष्ट्र व कर्नाटककासह इतर राज्यातही संपर्क व सुसंवाद आपोआप वाढत आहे,ही बाब त्यांच्यासाठी व बुरुड संघटनेसाठी मोलाची व सोयीची ठरली आहे.त्यांनी गणेशोत्सव व नवरात्र मंडळाच्या माध्यमातून सामाजिक कार्यास सुरुवात केली. त्यांना २०१९ साली बी के कंग्राली ग्रामपंचायतीची निवडणूक लढविण्याची चालून संधी आहे. त्यांनी महिला किंवा अनुसूचित गटाऐवजी थेट सर्वसाधारण गटातून काँग्रेस पक्षातर्फे निवडणूक जिंकली.त्यानंतर त्यांचे नेतृत्व व कार्यकर्तृत्व फुलतच गेले.आज त्यांचा त्या भागात आदर्श,कार्यक्षम, कर्तव्यदक्ष व लोकप्रिय प्रतिनिधी म्हणून ठसा उमटला आहे.त्यामुळे त्यांच्याकडे अनेक पदे चालून आली आहेत व येत आहेत.आज त्या बुरुड समाज महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षा आहेत.बेळगाव जिल्हा काँग्रेस(इंटक) ग्रामीण महिला आघाडीच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी त्यांच्याकडे आहे.अलीकडेच कर्नाटक सरकारच्या बेळगाव जिल्हा अनुसूचित समितीवर सदस्य म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली आहे.त्या हुबळी येथील बुरुड समाज मठाच्या सदस्यही आहेत.या साऱ्या पदांवरून त्या बचत गट व बांबू हस्तकलेच्या माध्यमातून महिलांचे संघटन व रोजगार वाढविण्यावर भर देत आहेत.त्यांनी बेळगवात चौदा बचत गट व तीन महिला मंडळे कार्यरत केली आहेत.त्या कोणत्याही गटबाजीच्या फंदात न पडता सोबत येणाऱ्यांना बरोबर घेऊन आपल्या कार्यात मजल दरमजल करत यशस्वी घोडदौड करीत आहेत.एवढे असूनही त्यांनी कधी दिमाख व डामडौल केला नाही, ठेविले अनंता तैसिची राहो,चित्ती असू द्यावे हा स्थायी भाव असतो. कोणत्याही यशस्वी स्त्रीच्या मागे एका पुरुषाचा हात असतो,हे त्यांच्या बाबतीतही तंतोतंत खरे आहे. बेळगावच्या आयकर विभागात कार्यरत असलेले त्यांचे पती श्री.रामकृष्ण यांचा जबरदस्त पाठिंबा व प्रोत्साहन आहे.ते सतत मेनकाताईंना प्रेरणा त्यांच्या कामात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य करीत असतात.त्यांनी दिलेल्या मोकळीकीमुळे व विश्वास दाखवल्यामुळेच आज सौ.मेनकाताई ह्या कोणत्याही क्षेत्रात गरुडझेप घेण्याच्या तयारीत असतात. पदवीधर असलेल्या कन्या सौ.तपस्या (गोकाक), कु.ऋतिका व छोटा मुलगा तन्मय हेसुद्धा त्यांना मदत करत असतात. दिवसेंदिवस सौ.मेनकाताईंच्या कार्याचा डोंगर वाढत जावो आणि बुरूड समाजाच्या शिरपेचात मानाचा खोवला जावो,ही संत शिरोमणी बुरुड केतेश्वर महाराज चरणी प्रार्थना!शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की,फूल है गुलाब का खुशबू लिया करो और प्यार है समाज का अपने प्यारे मेनकाताई को दिया करो

**लेखक दशरथ वडतिले**
**मा.अध्यक्ष,सोलापूर शहर बुरुड समाज, मो.९४२२४५७१००**

# नगरसेवकांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

(पान १ वरून...)

शिक्षकांच्या या अवांतर ड्युटीमुळे अनेक प्रकरणांमध्ये आवश्यक असणारी शालेय व गृह चौकशी वेळेत पूर्ण होऊ शकलेली नाही. परिणामी, निवडून आलेल्या उमेदवारांना वेळेत जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यात अडचणी येत होत्या. लोकप्रतिनिधींचे पद धोक्यात येऊ नये म्हणून सरकारने संबंधित कायद्यांमध्ये आवश्यक त्या सुधारणांना मंजुरी दिली आहे.

नागपुरात मध्य भारतातील सर्वात मोठा 'कॅन्सर केअर' प्रकल्प

मंत्रिमंडळाने नागपूर येथे हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रोन प्रकल्प स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. ३०० कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे कर्करोगाचे (कॅन्सर) अचूक निदान, उपचार आणि संशोधनाला मोठी चालना मिळणार आहे. नागपूरचे स्थान मध्यवर्ती असल्याने महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील सुमारे ५०० किलोमीटर परिसरातील रुग्णांना याचा थेट लाभ होईल. यामुळे रुग्णांचा मुंबई किंवा हैदराबादवरील अवलंबित्व कमी होऊन वाहतूक खर्च व उपचारातील विलंब टाळता येईल. हिंगणा तालुक्यातील भानसोली (किंही) येथील ३० हेक्टर जमीन या प्रकल्पासाठी दिली जाईल. एकूण ३०० कोटींपैकी १५० कोटी रुपये वैद्यकीय शिक्षण विभाग देणार असून उर्वरित खर्च उद्योग विभागामार्फत ५०:५० च्या प्रमाणात केला जाईल.

'विकसित भारत- जी राम जी' योजनेची राज्यात अंमलबजावणी

ग्रामीण भागातील रोजगार निर्मितीला आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना देण्यासाठी केंद्र पुरस्कृत 'विकसित भारत - जी राम जी' (रोजगार आणि आजिविका हमी मिशन - ग्रामीण) योजना राज्यात प्रभावीपणे लागू करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. केंद्र सरकारच्या विकसित भारत रोजगार आणि आजिविका हमी मिशन कायदा, २०२५ मधील तरतुदींशी सुसंगत बदल करण्यासाठी 'महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७' मध्ये आवश्यक सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील शाश्वत उपजीविकेच्या संधींचा विस्तार होणार आहे.

या कायद्यातील सुधारणांसाठी आणि आवश्यक अर्थसंकल्पीय तरतुदींनुसार खर्चास मान्यता देण्यासाठीचा अध्यादेश काढण्याकरिता राज्यपालांकडे प्रस्ताव पाठवला जाणार आहे.

# राज्यात २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण दिन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील बालकांना पोलिओसारख्या गंभीर आजारांपासून संरक्षण मिळावे तसेच गोवर-रुबेला निर्मूलन आणि एचपीव्ही लसीकरण मोहिमेला गती मिळावी, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश राज्य लसीकरण कृती दलाच्या बैठकीत देण्यात आले. सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

२८ जून २०२६ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण दिनाच्या तयारीचा आढावा बैठकीत घेण्यात आला. राज्यात ० ते ५ वर्षे वयोगटातील अंदाजे १ कोटी २ लाख ९१ हजार ८१६ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे डोस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यासाठी राज्यभरात ८९ हजार ४८९ लसीकरण बूथ, २ लाख ७६ हजार १६१ घरभेट पथक दिवस, २६ हजार ५३० संक्रमण पथक दिवस, १३ हजार ५१८ मोबाईल पथक दिवस आणि ५८६ रात्रीची विशेष पथके कार्यरत राहणार आहेत.

महाराष्ट्राने पोलिओ निर्मूलन मोहिमेत उल्लेखनीय यश मिळविले असून राज्यातील शेवटची पोलिओची नोंद झालेली घटना सप्टेंबर २०१० मध्ये बीड जिल्ह्यात आढळली होती. भारतातील शेवटचे पोलिओचे प्रकरण जानेवारी २०११ मध्ये पश्चिम बंगालमध्ये नोंदविण्यात आले होते. त्यानंतर जागतिक आरोग्य संघटनेने २७ मार्च २०१४ रोजी भारताला पोलिओमुक्त देश म्हणून घोषित केले.

**लसीकरण मोहिमेला सर्व विभागांनी सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन**

बैठकीत गोवर-रुबेला निर्मूलन कार्यक्रमाचाही आढावा घेण्यात आला. एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत राज्यात एमआर पहिला डोस ९९.६ टक्के तर एमआर दुसरा डोस ९९.४ टक्के इतका लसीकरणाचा दर नोंदविण्यात आला. तथापि, काही जिल्ह्यांमध्ये गोवरचे उद्रेक झाल्याने लसीकरणाबाबत अधिक सतर्कता बाळगण्याची गरज व्यक्त करण्यात आली. एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा आढावा घेताना राज्यातील एकूण ९ लाख ८४ हजार ४१४ लाभार्थ्यांपैकी ६३ हजार ७४७ मुलींना लस देण्यात आल्याची माहिती सादर करण्यात आली. राज्यातील मोहिमेची सरासरी प्रगती ६.४८ टक्के असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ही मोहीम ८ सप्टेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.



शिक्षण विभागाच्या सक्रिय सहभागातून या मोहिमेला अधिक गती देण्याचे ठरविण्यात आले. राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी शालेय शिक्षण, महिला व बालविकास, नगरविकास, ग्रामविकास, अल्पसंख्याक विकास, पंचायत राज, आदिवासी विकास, वैद्यकीय शिक्षण, इतर मागास बहुजन कल्यांण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहायय , माहिती व जनसंपर्क तसेच रेल्वे विभाग यांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले. अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची मदत घेऊन एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यावर बैठकीत भर देण्यात आला.



# अनधिकृत पार्किंगमुळे वाहतूक कोंडी; कारवाईची नागरिकांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर (प्रतिनिधी) : घाटकोपर पश्चिम येथील अमृत नगर परिसरातील सुजाता हॉटेलकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर अनधिकृत वाहन पार्किंगची समस्या गंभीर बनली आहे.बँक ऑफ इंडिया समोर तसेच जुनी ओएनजीसी कॉलनी परिसरातील रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात चारचाकी व इतर वाहने उभी राहत असल्याने नागरिकांना व वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार,रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहने उभी राहत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून आपत्कालीन सेवांनाही अडचणी येण्याची शक्यता आहे.या भागात सकाळ व सायंकाळच्या वेळेत वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे.याबाबत संबंधित प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन अनधिकृत पार्किंगवर कारवाई करावी,तसेच वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात,अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. नागरिकांच्या सोयीसाठी नियमित तपासणी मोहीम राबवून नियमभंग करणाऱ्यांवर वाहनांवर कठोर कारवाई करण्याचीही अपेक्षा व्यक्त होत आहे.

# आता कौटुंबिक वाटणीची मोजणी फक्त २०० रुपयांत, ९० दिवसांत प्रक्रिया पूर्ण होणार; सरकारकडून जमीन मोजणीचे नवे नियम जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील सर्वसामान्य शेतकरी आणि जमीनधारकांसाठी राज्य सरकारने एक अत्यंत दिलासादायक आणि मोठा निर्णय घेतला आहे.

जमीन मोजणीच्या प्रक्रियेत होणारा उशीर आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी शासनाने मोजणीचे नवे दर आणि कडक नियम जारी केले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, आता कुटुंबात झालेल्या जमिनीच्या वाटणीची मोजणी प्रति पोटहिस्सा अवघ्या २०० रुपयांत केली जाणार आहे.

या नवीन नियमांनुसार, 'नियमित मोजणी' ९० दिवसांत तर 'द्रुतगती (फास्ट ट्रॅक) मोजणी' ३० दिवसांत पूर्ण करणे भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांना बंधनकारक करण्यात आलं आहे. यामुळे मोजणीसाठी महिनेन्महिने कार्यालयाचे उंबरठे झिजवणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

कौटुंबिक वाटणी मोजणी : कोर्ट वाटप किंवा आपसातील संमतीने होणाऱ्या कौटुंबिक जमिनीच्या मोजणीसाठी प्रति पोटहिस्सा अवघे २०० रुपये शुल्क आकारले जाईल.

ग्रामीण भाग मोजणी दर : २ हेक्टरपर्यंतच्या जमिनीसाठी नियमित मोजणी फी २,००० रुपये, तर ३० दिवसांत मोजणी करून देणाऱ्या द्रुतगती मोजणीसाठी ८,००० रुपये शुल्क असेल.

शहरी भाग मोजणी दर : १ हेक्टरपर्यंतच्या जमिनीसाठी नियमित मोजणी फी ३,००० रुपये, तर द्रुतगती मोजणीसाठी १२,००० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

गुंठेवारी मोजणी : महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियमांतर्गत येणाऱ्या भूखंडांच्या मोजणीसाठी नियमित दरापेक्षा दीडपट शुल्क आकारले जाईल.

अर्जदार गैरहजर राहिल्यास दंड : निश्चित केलेल्या मोजणीच्या दिवशी जर अर्जदार स्वतः शेतावर गैरहजर राहिला, तर त्याला 'पुनर्भेट शुल्क' म्हणून मूळ फीच्या ५० टक्के किंवा कमाल १०,००० रुपयांपर्यंत दंड भरावा लागेल.

भूमापक (अधिकारी) गैरहजर राहिल्यास सवलत : जर निश्चित तारखेला संबंधित सरकारी भूमापक किंवा अधिकारी अनुपस्थित राहिला, तर मात्र अर्जदाराला कोणतेही अतिरिक्त पुनर्भेट शुल्क द्यावे लागणार नाही.

उच्चतपासणी फी : कनिष्ठ भूमापकाने केलेल्या मोजणीवर काही आक्षेप असल्यास, वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत पुन्हा तपासणी करण्यासाठी मूळ शुल्काच्या ३ ते ५ पट अधिक फी भरावी लागेल.

या नवीन धोरणात विविध संस्थांना मोजणी दरात विशेष सवलत देण्यात आली आहे.

निमशासकीय संस्थांना मोजणी दरामध्ये ५० टक्के सवलत दिली जाईल, तर पूर्णतः शासकीय मालकीच्या जमिनींच्या मोजणीसाठी ७५ टक्के सवलत लागू राहील. या ऐतिहासिक निर्णयामुळे महसूल विभागाच्या कारभारात पारदर्शकता येईल, असा विश्वास महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे.

# निफाड येथे युवा सेनेची आढावा बैठक संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शासकीय विश्राम गृह निफाड येथे युवासेने ची निफाड विधानसभा कार्यकारणी आढावा बैठक नुकतीच पार पडली असून शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे , खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे यांचे सुचनेनुसार व युवा सेना उत्तर महाराष्ट्र विभागीय सचिव अविष्कार भुसे यांचे अध्यक्षतेखाली शिवसेना युवासेना उत्तर महाराष्ट्रा विभागीय दौरा निफाड शहर युवासेना कार्यकारिणी आढावा बैठक पार पडली..या प्रसंगी युवासेना उत्तर महाराष्ट्र निरिक्षक अभिषेक भाऊसाहेब चौधरी, प्रथमेश पाटील ,निफाड नगरपंचायतीचे मा.नगरसेवक देवदत्त कापसे ,निफाड विधानसभा संपर्क प्रमुख अनिकेत कुंदे , उपस्थित होते... याप्रसंगी भूषण यांनी पुढील निवडणुका डोळ्यासमोर ठेवून युवा कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले असून प्रत्येक कार्यकर्त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या,या वेळी डॉ.प्रतिक बाफणा ड.स्वराज सुनिल कुंदे,युवासेना पदाधिकारी,शुभम आव्हाड सागर बोडखे कृष्णा मुरकुटे निफाड तालुक्यातील युवासैनिक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते ! आभार ॲड स्वराज कुंदे यांनी मानले

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# महामार्ग संलग्न अपघात प्रवण क्षेत्राच्या ठिकाणी तात्काळ उपाययोजना कराव्यात : जिल्हाधिकारी कार्तीकेयन एस.

## राज्य रस्ते विकास महामंडळाने विहिरीच्या संरक्षक कठड्याचे काम तात्काळ सुरु करावे; रस्ते अपघात चौकशीसाठी समितीची स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी :

पंढरपूर सातारा महामार्गावरील वाढत्या अपघातांना रोखण्यासाठी तसेच महामार्गावरील वाहतूक सुरळीत होण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने महामार्ग संलग्न अपघात प्रवण क्षेत्राच्या ठिकाणी तात्काळ उपाययोजना कराव्यात अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तीकेयन एस. यांनी दिल्या.

रविवार दि. १४ जून रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास पंढरपूर - सातारा महामार्गावरील तांदूळवाडी जवळ टेम्पो चालकाचा वाहनावरील ताबा सुटून

रस्त्यालगत असलेल्या विहिरीत वाहन कोसळले या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला. या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्तीकेयन एस. यांनी तांदुळवाडी (ता.माळशिरस) हद्दीतील महामार्ग संलग्न अपघात प्रवण क्षेत्राची पाहणी केली

**जिल्हाधिकारी यांनी केली धोकादायक रहदारी मार्गाची पाहणी**

यावेळी त्यांच्या समवेत प्रांताधिकारी विजया पांगारकर, तहसीलदार सुरेश शेजुळ, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उप अभियंता पी. एस.राऊत तसेच संबंधित अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले , सातारा- पंढरपूर महामार्गावरील तांदुळवाडी हद्दीत रस्त्यालगत धोकादायक तीन विहिरी असून, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने तात्काळ रस्त्यालगत असणाऱ्या विहिरींच्या संरक्षक भिंतीचे काम सुरू करावे. तसेच अपघात प्रवण क्षेत्रा-वर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात अशा सूचना करून रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे का, भूसंपादन प्रमाणे रस्ता झाला आहे का, मार्गावरील पुल व रस्त्याचे काम अंदाजपत्रकानुसार झाले आहे का, रस्त्याची रुंदी, रस्त्यावर गतिरोधक, लोखंडी बॅरिकेट, रिफ्लेक्टर संरक्षण कठडे, प्रकाश व्यवस्था, यासारख्या उपाययोजना आहेत का याची चौकशी करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे. या चौकशीमध्ये दोषी असणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी येथील ग्रामस्थांनी तांदुळवाडी हद्दीत वारंवार अपघात घडत असून रस्त्याची काम भूसंपादनाप्रमाणे झाले नाही. रस्त्याचे काम पूर्णपणे निकृष्ट दर्जाचे झाले आहे. तसेच तांदुळवाडी हद्दीतील उघडे पुलावर सतत खड्डे पडत असल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. संबंधित ठेकेदाराकडून तात्पुरती डागडुजी करण्यात येते. सदर पुलाचे स्ट्रक्चर ऑडिट करावे अशी मागणी केली.

जिल्हाधिकारी यांनी तांदुळवाडी हद्दीतील महामार्गालगत असणाऱ्या तीन विहिरींची तसेच उघडे पूल येथील पाऊणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.



# यंदा शेतकऱ्याचे गणित चुकणार की काय? पिकांना पाणी नाही; शेतकरी चिंतेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
टाकळीवाडी प्रतिनिधी

टाकळीवाडी तालुका शिरोळ परिसरासह तालुक्यात यंदा पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. खरीप हंगामाची तयारी पूर्ण करून अनेक शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या असल्या तरी अपेक्षित पाऊस न झाल्याने पिकांना पाण्याचा तुटवडा जाणवत आहे. त्यामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



गेल्या काही दिवसांपासून वातावरणात ढगाळ परिस्थिती निर्माण होत असली तरी समाधानकारक पाऊस होत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. मका, सोयाबीन, भुईमूग तसेच इतर खरीप पिकांना वेळेवर पाणी मिळणे गरजेचे असताना शेतकऱ्यांना आभाळाकडे डोळे लावून बसावे लागत आहे.

काही ठिकाणी पिके उगवणीनंतर करपू लागल्याचे चित्र दिसून येत आहे. विहिरी व इतर जलस्रोतांतील पाणीसाठाही मर्यादित असल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. वेळेत पाऊस न झाल्यास उत्पादनात घट होऊन आर्थिक नुकसान सहन करावे लागेल, अशी भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

दरम्यान, हवामान खात्याच्या अंदाजानुसार येत्या काही दिवसांत पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र, तोपर्यंत शेतकरी चिंतेच्या छायेत असून यंदाचे शेतीचे गणित चुकणार की काय, अशी चर्चा परिसरात सुरू आहे.

# पालखेड विद्यालयात ढोल ताशांच्या गजरात नवागतांचे स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
निफाड /प्रतिनिधी

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना शालेय प्रवाहात आणावे त्यांना दर्जेदार शिक्षण देण्यात यावे, मुक्त शिक्षण द्यावे या दृष्टीने महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल पालखेड,ता.निफाड येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना ढोल ताशांचा गजरात शाळेत प्रवेश देण्यात आला.



याप्रसंगी महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे,शरद आहेर, विजय गायकवाड, योगेश होलगडे, संतोष आहेर, जितेंद्र थेटे, संदीप गांगुर्डे,समाधान थेटे, माजी मुख्याध्यापक डी.एम.थेटे, विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन रंजनामाई थेटे, बाळासाहेब थेटे,ज्ञानेश्वर जाधव,रमेश शिंदे,महेंद्र छाजेड, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश थेटे, शिक्षक पालक संघाचे अध्यक्ष विजय आहेर, उपाध्यक्ष रविंद्र कोकाटे,मुख्याध्यापक अशोक शेळके,केशव खैरे, भाऊसाहेब शिंदे, वसंत कहाणे,संदीप आहेर,भरत आहेर,सुरेश चारोस्कर,अर्जुन जाधव,दौलत चौधरी यांचं पालखेड पंचक्रोशीतील ग्रामस्थ व्यासपीठावर होते.

यावेळी विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आकर्षक रांगोळी, फलकलेखन याचबरोबर ढोल ताशांचा गजरात नवागतांचे मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले.

यावेळी नवीन दाखल झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.तसेच सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक देखील मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात येऊन विद्यार्थ्यांना गोड शिरा आणि मसाले भाताची मेजवानी देखील देण्यात आली.

तसेच विद्यालयाचे माजी विद्यार्थी कृष्णा चव्हाण,कृष्णा थेटे पॅरा कमांडो तर कुणाल चौधरी यांची पोलीस दलात निवड झाली, त्यांच्या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयास बेंचेस उपलब्ध करून देण्यात मोलाचे सहकार्य करणारे अर्जुन जाधव यांचाही सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सावन जाधव यांनी तर आभार संजय लव्हंगडे यांनी मानले.

# मयूर मोरे यांना ‘राज्यस्तरीय आदर्श समाज रत्न पुरस्कार’ जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल बुलढाण्याचे सुपुत्र मयूर सुरेश मोरे यांना प्रतिष्ठेचा 'राज्यस्तरीय आदर्श समाज रत्न पुरस्कार - २०२६' जाहीर झाला आहे.

'विजेता मीडिया, पुणे' यांच्या वतीने महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान मान्यवरांचा सन्मान करण्यात येतो. यावर्षी पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल मयूर मोरे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

मयूर मोरे यांनी निर्भीड पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले असून, अनेक सामाजिक उपक्रमातही ते अग्रेसर राहिले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन राज्यस्तरावर त्यांचा गौरव होत आहे.

पुरस्कार सोहळा:

हा पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दि. २१ जून २०२६ रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत शिक्षक भवन, पत्रकार भवन शेजारी, निवारा वृद्धाश्रम गेट समोर, १९२, नवी पेठ, गांजवे चौक, पुणे - ४११०३० येथे संपन्न होणार आहे.

या घोषणेनंतर बुलढाणा जिल्ह्यासह राज्यभरातील पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातून मयूर मोरे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हा पुरस्कार बुलढाण्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारा ठरला आहे.

# झेप किशोरी विकास प्रकल्पांतर्गत गरजू मुलींना शेळ्या, सायकल, शिलाई मशीन व शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदगी (एस. के. गायकवाड) : हॅलो मेडिकल फाउंडेशन, अणदूर व स्विस-एड संस्थेच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणारा झेप किशोरी विकास प्रकल्पा अंतर्गत तुळजापूर तालुक्यातील धनगरवाडी, सराटी सह तुळजापूर व लोहारा तालुक्यातील काही गावांमध्ये गरजू किशोरवयीन मुलींना शालेय साहित्य( बॅग ), सायकल,शिलाई मशीन व शेळ्याचे वाटप करण्यात आले.

या बाबत सविस्तर वृत्त असे की हॅलो मेडिकल फाउंडेशन अणदूर व स्विसएड संस्थेच्या संयुक्त विद्यमाने रावीविण्यात येणारा झेप किशोरी विकास प्रकल्प जून २०२५ पासून तुळजापूर व लोहारा तालुक्यातील ३० गावांमध्ये कार्यरत आहे. १३ ते १७ वयोगटातील मुलींच्या लिंगभाव दृष्टिकोनात सकारात्मक बदल घडवून आणणे, निर्णयक्षमता वाढवणे, जीवन कौशल्ये विकसित करणे तसेच बालविवाह रोखण्यासाठी मुलींना सक्षम बनवणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी पालक, युवक व शासकीय यंत्रणांचा सहभाग वाढवून जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचे काम प्रकल्पामार्फत केले जात आहे. प्रकल्पांतर्गत गावपातळीवरील सखींच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात असून गरजू व असुरक्षित मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात कायम ठेवण्यासाठी उत्पन्नवाढीची साधने उपलब्ध करून दिली या प्रकल्पांतर्गत लोहारा आणि तुळजापूर तालुक्यातील ३० गावांमध्ये शेळ्या, शिलाई मशीन, सायकल व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तुळजापूर आणि लोहारा तालुक्यातील ९५ मुलींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले, १९ मुलींना शेळीपालनासाठी मदत करण्यात आली, १३ मुलींना शिलाई मशीन वाटप करण्यात आली, ८ मुलींना सायकल वाटप करण्यात आली या मदतीमुळे मुलींचे शिक्षण सुरू राहण्यास व त्यांच्या कुटुंबाच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे.




या कार्यक्रमासाठी स्विसएड संस्थेच्या स्नेहा गिरिधारी मॅडम, प्रकल्प अधिकारी जितेंद्र सावकर, हॅलो मेडिकल फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. शुभांगी अहंकारी, प्रकल्प संचालक डॉ. क्रांती रायमाने, प्रकल्प समन्वयक नागिनी सुरवसे, किशोरी सहाय्य समितीचे सदस्य दिनकर गाढवे व जावेद शेख, प्रकल्प अकाउंटंट मुन्नाबी इनामदार, डाटा कलेक्टर मिराज नदाफ तसेच पर्यवेक्षिका रत्नमाला खरोसे, सुमती कानडे, शीला भोजने, पल्लवी गायकवाड यांचे सहकार्य लाभले.

**मंदिरे समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती**

# श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास अधिक मासात ९ कोटी ४६ लाखांचे उत्पन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी/ पंढरपूर

अधिकमास कालावधीत राज्यासह परराज्यातून लाखो भाविकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे हजेरी लावत मोठ्या श्रद्धेने रोख देणगी तसेच सोने-चांदीचे दागिने अर्पण केले. विविध माध्यमांतून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीस एकूण रु. ९,४६,२८,२३३ इतके उत्पन्न प्राप्त झाल्याची माहिती मंदिरे समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.



दि. १७ मे ते १५ जून या अधिकमास कालावधीत भाविकांकडून श्रींच्या चरणी रु. ८१,७२,६७९ अर्पण करण्यात आले. याशिवाय देणगीद्वारे रु. २,०३,५५,१८०, लाडू प्रसाद विक्रीतून रु. ७२,३३,७००, भक्तनिवासातून रु. १,२५,५६,७२३, पूजाविधीमधून रु. ११,०३,४२७, हुंडीपेटीतून रु. २,५३,८२,३४४, सोने-चांदी अर्पणातून रु. १,७८,४३,१६७, तसेच फोटो विक्री, महावस्त्रे, शेणखत, गोमूत्र, मोबाईल लॉकर, जमा पावती, चंदन आदी विविध माध्यमांतून रु. १९,८१,०१३ इतके उत्पन्न प्राप्त झाले.

तुलनात्मकदृष्ट्या, सन २०२३ च्या अधिकमासात श्रींच्या चरणी रु. ७३,९५,३५३, देणगी रु. १,५२,९०,३३५, लाडू प्रसाद विक्री रु. ८७,७३,३००, भक्तनिवास रु. १,००,५०,००९, पूजाविधी रु. २८,०५,७४१, हुंडीपेटी रु. २,२५,७०,४९१, सोने-चांदी अर्पण रु. ३३,१७,७४९ आणि इतर विविध माध्यमांतून रु. १७,३९,४५९ इतके उत्पन्न प्राप्त झाले होते.

अधिकमासात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. यंदाच्या अधिकमासात ५,३०,६२० भाविकांनी पदस्पर्श दर्शन, तर सुमारे ९,३०,०६८ भाविकांनी मुखदर्शनाचा लाभ घेतला.

सन २०२३ च्या अधिकमासात मंदिरे समितीस रु. ७,१९,४२,४३७ इतके उत्पन्न मिळाले होते. यंदा ते वाढून रु. ९,४६,२८,२३३ इतके झाले असून, मागील अधिकमासाच्या तुलनेत रु. २,२६,८५,७९६ इतकी वाढ नोंदविण्यात आली आहे.

या उत्पन्नातून श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या वारकरी व भाविकांना अधिक चांगल्या आणि पुरेशा सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मंदिर समिती सातत्याने प्रयत्नशील राहील, असे मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी सांगितले.

# पुण्यातील आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांची विविध मुद्द्यांवर चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे (प्रतिनिधी): पुण्यामध्ये आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांसोबत रिपब्लिकन व पँथर चळवळी, महिला व शेतकरी चळवळी आणि सध्याची सामाजिक-राजकीय परिस्थिती यांबाबत सखोल चर्चा करण्यात आली. या चर्चेत ज्येष्ठ मार्गदर्शक वसंतराव साळवे आणि चंद्रकांत काळे; पुणे कँटोनमेंट बोर्डाचे माजी उपाध्यक्ष रोहिदासजी गायकवाड; सुधाकर कांबळे; आरपीआयचे ज्येष्ठ नेते असित गंगुर्डे, शैलेंद्र चव्हाण आणि सुनील भोसले; ड. करण जगताप; संतोष कांबळे; तसेच ज्येष्ठ कार्यकर्ते रावसाहेब झेंडे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्रा. डॉ. विलास आढाव यांचा सहभाग होता.



जेष्ठ मार्गदर्शक वसंत साळवे यांनी नमूद केले की, आंबेडकरी चळवळीच्या पुनरुज्जीवनासाठी केवळ ये-जा करणाऱ्यांऐवजी निष्ठावान कार्यकर्त्यांची गरज आहे.

रोहिदास गायकवाड यांनी निरीक्षण नोंदवले की, पँथर चळवळीचे पुनर्परीक्षण होणे गरजेचे असून, त्यातील विधायक आणि सर्जनशील कार्य तरुणांपर्यंत पोहोचवले पाहिजे. समारोपप्रसंगी डॉ. विलास आढाव म्हणाले की, भविष्यातील प्रवाह आणि गती लक्षात घेता, निष्ठावान व ज्येष्ठ आंबेडकरी कार्यकर्त्यांनी तरुणांना मार्गदर्शन करून त्यांच्यामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक वारसाचे मंथन घडवून आणणे अत्यंत आवश्यक आहे.

या प्रक्रियेतून सक्षम आणि बुद्धिमान तरुणांचा एक भक्कम फळी तयार होईल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडलेली ही चर्चा अत्यंत प्रबोधनपर, बोधप्रद आणि दिशादर्शक ठरली.




# महावितरण विजेचा आदेश रद्द करून शेतकऱ्यांना सुरळीत वीजपुरवठा द्यावा आ. अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

फंढरपूर प्रतिनिधी – सध्या ज्वलंत असणारा लाईटचा प्रश्न घेऊन आज सोलापूर येथे महावितरण कंपनीचे मुख्य अभियंता श्री सुनील माने साहेब यांची आमदार अभिजीत पाटील यांनी भेटून माढा मतदारसंघ व नदीकाठच्या कृषी पंपाचा वीज पुरवठा बंद करण्याबाबत करण्यात आलेला आदेश रद्द करून शेतकऱ्यांना पूर्ण क्षमतेने नियोजित सुरळीत वीज पुरवठा व्हावा यासाठी भेटून निवेदन दिले.

माढा मतदारसंघ, व नदीकाठची गावे व सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी सध्या विविध पिकांची लागवड, व पाणी व्यवस्थापन व चिंचनाच्या कामांमध्ये व्यस्त आहेत अशा परिस्थितीत कृषी पंपाचा वीज पुरवठा बंद करण्याबाबत करण्यात आलेल्या आदेशामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाले असून शेती व्यवसायावर त्यांचा विपरीत परिणाम होत आहे.

तसेच अनेक भागांमध्ये शेतकऱ्यांना नियमानुसार आठ तास वीजपुरवठा अपेक्षित असताना केवळ सहा तास वीजपुरवठा मिळत आहे. तोही अनेक वेळा कमी दाबाने अथवा खंडित स्वरूपात मिळत असल्याने पिकांना वेळेवर पाणी देता येत नाही परिणामी ऊस, डाळिंब, भाजीपाला, फळबाग तसेच इतर हंगामी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतीसाठी विजेवर चालणाऱ्या शेतकऱ्यांचे अवलंबून आहे. वीजपुरवठा कमी कालावधीत किंवा बंद राहिल्या शेतकऱ्याची नुकसान होणार आहे. त्याचा थेट परिणाम शेतकरीच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहे.

तरी आपण या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन कृषी पंपाचा वीज पुरवठा बंद करण्याबाबत जारी करण्यात आलेला आदेश तात्काळ रद्द करावा. तसेच सध्या दिला जाणारा सात तासाचा वीजपुरवठा हा अखंडित पुरेशा दाबाने वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत तात्काळ योग्य ती कारवाई करण्यात यावी यासाठी आमदार अभिजीत पाटील यांनी भेट घेऊन सांगितले.

# बनसोडेच्या वाचाळ वीरांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट काँग्रेसकडून जाहीर निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी – पंढरपूर येथे नुकत्याच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफी ही सरसकट दिली जावी आणि कर्जमाफी बाबत असलेल्या

### गोमूत्र शिंपडणे भाजपला पडणार महागात

ज्याचकाठी रद्द करण्यात यासाठी पंढरपूर येथील संस्थेचा अन्न त्या उपोषण सुरू केले होते. तीन ते चार दिवस झालेले हे अन्न त्या कुपोषण या ठिकाणी महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन आणि या उपोषणांच्या स्थळी येऊन रोहित पवार यांच्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफी बाबत जाचक अटी रद्द करण्याच्या बाबतीत लवकरच निर्णय घेऊ असे आश्वासन दिले.

आणि आमदार रोहित पवार यांनी आपल्या अन्न त्या उपोषण सोडले. यावेळी उपस्थित पंढरपूर मंगळवेढा तालुक्याचे भाजपचे आमदार समाधान आवताडे तसेच विधान परिषदेची माजी आमदार प्रशांत परिचारक हे



भाजपचे मान्यवर नेते मंडळी ही उपस्थित होते.

. हे उपोषण संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी भाजपच्या काही वाचाळ वीरांनी या उपोषण स्थळी येऊन गोमूत्र शिंपडून जागा शुद्ध केल्याने कार्य केले याचा निषेध म्हणून पंढरपूर शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाची शहराध्यक्ष सुधीर आबा भोसले उद्योगपती, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उद्योग व व्यापारचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे, शहराध्यक्ष दीपक वाडदेकर, युवराज भोसले आदित्य फत्तेपुरकर अन्य महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.




यावेळी आपल्या मनोगतामध्ये वरील नेते मंडळींनी व्यक्त होत असताना त्यांनी दारू पिऊन घाणीमध्ये लोणारचे जाहीर निषेध करून त्यांनी त्यांचा छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये जाहीर निषेध केला आहे.

# पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा सोलापूर जिल्ह्यातच मुक्काम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी – सोलापूर जिल्हा विधान परिषद निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे या निवडणुकीत महायुतीचे मतदान जास्त असली तरी त्या निवडणुकीमध्ये मोहिते पाटील गटाने यात लक्ष केंद्रित केले आहे त्यामुळे कोणताही धोका होऊ नये यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी निवडणुकीमध्ये लक्ष केंद्रित केल्या असून गेल्या काही दिवसापासून त्यांनी सोलापूर जिल्ह्यातच मुक्काम ठोकला आहे.

विधान परिषद निवडणुकीमध्ये भाजपने माजी आमदार राजेंद्र राऊत यांना तर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाने वसंत नाना देशमुख यांना उमेदवारी दिली आहे. सोलापूर जिल्ह्यात भाजपची ताकद आहे त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी प्रयत्न केले मात्र त्यांना यामध्ये यश आले नाही अशी दिसून येत आहे.



ही निवडणूक राजेंद्र राऊत विरुद्ध वसंतदादा देशमुख असे होणार असल्याचे दुरंगी लढत होणार आहे त्या निवडणुकीमध्ये मोहिते पाटील गटांनी लक्ष केंद्रित केले आहे त्यामुळे निवडणुकीमध्ये रंगत आली आहे या निवडणुकीमध्ये सूत्रे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर जिल्ह्याची पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे दिले आहेत त्यामुळे निवडणुकीत कोणताही दगाफटका होऊ नये यासाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी प्रत्येक तालुक्यातील मतदाराला जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या आहेत असल्याचे दिसून येत आहे तरीही मतदारांमध्ये संग्राम अवस्था निर्माण झाले तरीही त्यामुळे पालकमंत्री जयकुमार गोरे गेल्या काही दिवसापासून सोलापूर जिल्ह्यात तळ ठोकून आहे.

# अनंत चैतन्य प्रशालेत नवागतांचे उत्साहात स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट – दि १५ जून पासून नवीन शैक्षणिक वर्ष २०२६– २७ प्रारंभ झाला. याचे औचित्य साधून महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्य.व उच्च माध्यमिक प्रशाला,हन्नूर येथे सर्व नवागतांचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. शाळेत पहिल्यांदा येणाऱ्या, प्राथमिक शाळेतून माध्यमिक प्रशालेत प्रवेशित होणाऱ्या सर्व बालचमु व मोठ्या मुलां– मुलीमध्ये पहिल्या दिवशी एकच लगबग व उत्साह दिसून आला.नवीन बॅग, नवीन गणवेश, नवीन पाठ्यपुस्तके याविषयीची कुतूहल, उत्सुकता विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होती. सर्वप्रथम शाळेतील प्रवेशोत्सवाची सुरवात माजी प्राचार्य मा.श्री सिद्धेश्वर कल्याणशेट्टी यांच्या हस्ते



प्रतिमापूजनाने करण्यात आली. यावेळी माजी उपसरपंच शरणप्पा हेगडे, माजी मुख्याध्यापक शिवप्पा साखरे, माजी शिक्षक सरदार मत्तेखाने व पालक वर्ग उपस्थित होते.

सर्व नवागतांचे व प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक विभागाच्या सौ. स्वप्नाली जमदाडे यांनी शब्द सुमनांनी स्वागत केले. यानंतर नावागतांचे औक्षण करून , बिस्किटे व गलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी सिद्धेश्वर कल्याणशेट्टी व शरणप्पा हेगडे यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्यात आली. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक ज्ञानदेव शिंदे , पर्यवेक्षक सुरेश जाधव, सांस्कृतिक विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे, धनंजय जोजन, शशिकांत अंकलगे, जेष्ठ शिक्षिका मृदुलादेवी स्वामी, सागर मठदेवरु, काशिनाथ पाटील, रविंद्र कालिबत्ते,सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शहाजी माने यांनी केले तर सर्वांचे आभार मल्लम्मा चपळगाव यांनी मानले.

### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री व पालकमंत्र्यांचे मंदिर समितीकडून शतशः आभार

# यमाई तलावालगतची शासनाची जमीन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीकडे हस्तांतरणास शासनाची मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर शहरातील गट क्रमांक १६१ मधील यमाई तलावालगत असलेली सुमारे ३ हेक्टर १२ आर क्षेत्रफळाची शासन मालकीची जमीन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्याकडे हस्तांतरित करण्याच्या प्रस्तावास शासनाने विविध अटी व शर्तींसह दि. १६ जून रोजी मंजुरी दिल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

याबाबत दि. २८ एप्रिल रोजी मंत्रालय, मुंबई येथे राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सदर जमीन मंदिर समितीकडे हस्तांतरित करण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी तात्काळ शासनास प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश मंत्री महोदयांनी दिले होते. त्यानुसार विभागीय आयुक्त, पुणे यांच्या मार्फत दि. ७ मे रोजी शासनास प्रस्ताव सादर करण्यात



आला होता.

सदर जागा मंदिर समितीस प्राप्त झाल्यानंतर त्या ठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी अत्याधुनिक पर्यटन (सहल) केंद्र तसेच गोमाता जतन व संवर्धन केंद्र उभारण्याचा मानस आहे. या प्रकल्पासाठी मंदिर समितीने प्रारूप आराखडा तयार केला असून, सदर काम मंदिर समितीच्या निधीतून करण्यात येणार आहे.

सद्यस्थितीत या जागेवर मंदिर समितीची गोशाळा कार्यरत असून, येथे सुमारे २५० लहान–मोठ्या देशी गाई व वासरांचे संगोपन अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केले जात आहे. गोवंशासाठी स्वच्छ व प्रशस्त निवारा, नियमित पशुवैद्यकीय तपासणी, पौष्टिक चारा तसेच पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था करण्यात आली आहे. गोशाळेतून प्राप्त होणाऱ्या दुधाचा उपयोग श्री विठ्ठल–रुक्मिणी मातेच्या नित्योपचार व धार्मिक विधींसाठी केला जातो. याशिवाय गोसेवेच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीतील गोमातेचे महत्त्व जपण्याचे आणि भाविकांमध्ये गोसंवर्धनाबाबत जनजागृती करण्याचे कार्यही मंदिर समितीमार्फत केले जाणार आहे.

यमाई तलावालगतची ही जागा मंदिर समितीकडे हस्तांतरित झाल्यानंतर येथे पर्यावरणपूरक व अत्याधुनिक सुविधांनी युक्त आदर्श ‘गोमाता जतन व संवर्धन केंद्र’ विकसित करण्यात येणार आहे. या केंद्रामध्ये देशी गोवंश संवर्धन, पशुवैद्यकीय सेवा, चारा विकास, गोआधारित उपक्रम तसेच भाविकांना गो–सेवेचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल अशा विविध सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. त्यामुळे पंढरपूरमध्ये धार्मिक पर्यटनासोबतच गोसंवर्धन आणि पर्यावरण संवर्धनालाही मोठी चालना मिळणार आहे.

दि. २८ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीस ऑनलाइन पद्धतीने मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निराळी, मंदिर समिती सदस्य ह.भ.प. भास्करगिरी महाराज, प्रांताधिकारी सचिन इथापे, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे तसेच प्रत्यक्ष उपस्थितीत मंदिर समिती सदस्या ड. माधवी निगडे व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते.

सदर महत्त्वपूर्ण प्रस्तावास शासनाने मंजुरी दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राजी (वहिनी) पवार, महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे तसेच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमारजी गोरे यांचे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने शतशः आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

शासनाच्या या ऐतिहासिक निर्णयानिमित्त आज सायंकाळी गोशाळा परिसरात गोमातेचे पूजन करण्यात आले. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे, व्यवस्थापक प्रविणकुमार घम, विभाग प्रमुख अतुल बक्षी, राजेंद्र सुभेदार, सावता हजारे, योगराज बाणेकर, शंकर मदने, यशवंत गुरव, समीर ढोबळे तसेच कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# गादेगाव ते गव्हाणे वस्ती रस्त्याच्या दुरुस्तीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाची मागणी; खा. प्रणिती शिंदे यांना साकडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर लोकसभा मतदारसंघातील पंढरपूर तालुक्यातील गादेगाव ते गव्हाणे वस्ती (ग्रा.मा. १०७) या सहा किलोमीटरच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून, हा रस्ता तातडीने दुरुस्त करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश एकनाथ फाटे यांनी सोलापूरच्या खासदार मा. प्रणिती शिंदे यांच्याकडे केली आहे.

गादेगावची लोकसंख्या सुमारे १२,००० आहे. १० वर्षांपूर्वी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत बांधण्यात आलेला हा रस्ता सध्या अत्यंत खराब झाला असून त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरून शालेय विद्यार्थी, नागरिक आणि वाहनांची मोठी वर्दळ असते. पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनधारकांना रस्ता समजणे कठीण होते, ज्यामुळे अनेकदा छोटे–मोठे अपघात झाले आहेत.

ग्रामस्थांची होणारी गैरसोय लक्षात घेता, खासदार निधीतून या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तातडीने निधी मंजूर करावा, अशी आग्रही मागणी नागेश फाटे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.